चिपळूण नगर परिषद, चिपळूण
दिनांक : ०९/१०/२००९

प्रेस नोट

चिपळूण नगर परिषदेमार्फत मुख्याधिकारी श्री. गणेश शेटे यांचे संकल्पनेतून दिनांक ०९/११/२००९ पासून शहरांतील बँक ऑफ इंडीया, युनियन बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, आय.डी.बी.आय. बँक चिपळूण अर्बन को-ऑप. बॅक लि या बँकांचे शाखेमध्ये घरपट्टी व अन्य करांची रक्कम भरणेची सुविधा नागरिकांना उपलब्ध करुन देणेत येणार आहे. या सुविधेचे उद्‌घाटन चिपळूण नगर परिषदेचे उपाध्यक्षा सौ. गौरी जीवन रेळेकर यांचे शुभहस्ते दिनांक ०९/११/२००९ रोजी सायं. ४.०० वाजता चिपळूण नगर परिषदेच्या कै. श्रावणशेठ उर्फ भाई दळी सभागृह येथे संपन्न झाले आहे.

या कार्यक्रमाला शहरातील बॅकांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच या कार्याक्रमाला नगर परिषद सदस्य श्री. निशिकांत नारायण भोजने, श्री. शंकर नारायण बैकर, श्री. इस्माईल अ.ल. खतीब, सौ. सुचित्रा सचिन खरे, सौ. अंजली य. कदम, सौ. उज्वला गौ. जाधव, सौ. हुस्नबानू नि. अ. पाते तसेच नगर परिषदेचे प्रशासकीय अधिकारी लेखापाल, अंतर्गत लेखा परिक्षक व वरिष्ठ लिपीक व कर्मचारी उपस्थित होते.

प्रथम लेखा परिक्षक श्री. रानडे यानी प्राथाविकामध्ये या सुविधेसंबधि माहीती दिली त्याप्रमाणे नगर परिषदेने नव्याने देत असलेल्या मागणी बिलामध्ये चार भाग असुन वरील दोन भगामध्ये मागणी बिल व

पावती असुन तिसरा भाग बॅकेचा असुन चवथा भाग नगर परिषद कडे बँकामार्फत येणार आहे. या सुविधेमुळे नागरीकांना आपल्या खाते असल्ल्या बॅके वरील बॅकामध्ये आपली कराची रक्कम भरता येईल. यानंतर या सुविधेबाबत विस्तुत माहिती मा. मुख्याधिकारी श्री. गणेश शेटे यांनी दिली व बँकामार्फत कर भरण्याची सुविधा देणारी चिपळूण नगर परिषद ही महाराष्ट्रातील पहिली नगर पालिका असल्याचे सांगितले. याच प्रमाणे नागरीकांना विविध सोई व सवलती देण्याचा नगर परिषद विशेष प्रयत्न करील असे सांगितले. या कार्याक्रमासाठी उपस्थित बँक प्रतिनीधीतर्फे युनियन बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. काकडे साहेब व आ.डी.बी.आय. बॅकेचे शाखा व्यवस्थापक श्री. दुधारे साहेब यांनी या सुविधेसाठी नगर परिषदेला सर्व बँका सहकार्य करतील व नागरीकांच्या सोईसाठी नगर परिषद ही सुविधा देत असल्यामुळे याबाबत कोणतेही चार्जेस बँका नगर परिषदेला आकारणार नाही असे सांगितले.

या कार्यक्रमासाठी खास करून उपस्थित असलेले चिपळूण अर्बन को-ऑप. बँकेचे चेअरमन श्री. संजयशेठ रेडीज यांनी नगर पालिकेच्या या उपक्रमाला बँका प्राधान्य देतील व नगर परिषद नव्याने सुरू करीत असलेल्या सुविधेला शुभेच्छा दिल्या.

नगर परिषदेने या वर्षीपासून प्रत्येक करदात्यासाठी स्वतंत्र घरसंकेतांक दिलेला असून यासुविधेमुळे यापुढे ई-बँकींग तसेच कर मागणी तातडीने उपलब्ध करणे सोईचे होणार आहे. यासाठी विशेष परिश्रम घेणारे नगर परिषद कर्मचारी श्री. राजेंद्र खातू व श्री. दिलीप हराळे यांचे

मुख्याधिकारी यांनी विशेष अभिनंदन केले व त्यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला आहे.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्षा व नगर परिषदेच्या उपनगराध्यक्षा सौ. गौरीताई रेळेकर यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या व मुख्याधिकारी व नगर परिषद कर्मचारी यांचे अभिनंदन केले.

यांनतर श्री. रामदास सावंत, प्रशासकीय अधिकारी यांनी आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.